परिपत्रक क्रमांक 280 दिनांक 2/10/1992

खाली सही करणार यांचे अये निदर्शनासं आले आहे की, सार्वजनिक न्यास नोदंणी कार्यालय, धुळे येथे फेरबदल अर्जासंबंधीच्या वादातील चौकशीमध्ये दाखल केलेल्या प्रोसिडींग बुकामधील वाक्य रचनेत बदल झाला आहे. सदरहू बदल प्रोसिडींग बुक त्या कार्यालयाच्या ताब्यात असताना झाला व तो बदल तेथील काही कर्मचाऱ्यांनी केला असे आरोप केले असून त्यातून फौजदारी खटला निर्माण झाला आहे.

2/- वरील प्रमाणे प्रोसिडींग बुकात झालेला बदल कर्मचाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे आणि अक्षम्य दुर्लक्षामुळे झाला असल्याचे धर्मादाय आयुक्त यांचे प्रथमदर्शनी मत झाले आहे.

3/- अशा प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी दाखल झालेल्या कागदपत्राबाबत विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. मुख्यत: कागदपत्रे दाखल करुन घेताना ते बारकाईने तपासून घ्यावेत. त्याबद्दल त्या कागदाचे यादीवर नोंद घ्यावी. तसेच ते निरीक्षणासाठी इतरांना देताना निरीक्षणाचे वेळी त्यावर कटाक्षाने लक्ष ठेवणे आवश्यक आहे. जेणेकरुन निरीक्षण करणाऱ्याला पेपर्स काढून घेणे अथवा मजकुरात बदल करणे शक्य होणार नाही व कोणालाही त्याबाबतीत आरोप करण्याची संधी मिळणार नाही.

4/- वरील परिच्छेद 3 मधील सूचना संबंधितांनी काटेकोरपणे पाळाव्यात अन्यथा त्यांचेविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल.

क.मो. देसाई,<br>
धर्मादाय आयुक्त,<br>
महाराष्ट्र राज्य, मुंंबई.

दिनांक :- 3/10/1992<br>
प्रत :-

1. धर्मादाय सह आयुक्त,पुणे/औरगाबाद/लातूर<br>
धर्मादाय उप आयुक्त, बृहन्मुंबई/कोल्हापूर/सोलापूर/भंडारा

1. सहाय्यक धर्मादाय आयुक्त,<br>
/सांगली/सातारा/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/रायगड/ नाशिक /अहमदनगर/ जालना/<br>
जळगांव/धुळे//परभणी/ नांदेड/लातूर//उस्मानाबाद/बीड/अकोला/बुलढाणा/.<br>
अमरावती/ यवतमाळ/चंद्रपूर/वर्धा/गडचिरोली

2.